**रयत शिक्षण संस्थेचे,**

# यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा.

## नोटीस

**दि.३/९/२०२१**

कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व सी.एच.बी., हंगामी, लमसम, रजामुदत, शिक्षकांना कळविण्यात येते की, मा.सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा. यांच्याकडील परिपत्रक क्र.१२ दि.२/९/२०२१ चे पत्राची सांक्षाकित प्रत जोडली आहे. ते वाचून सहया कराव्यात व त्याप्रमाणे कारवाई करावी.

Yashavantrao Chavan Institute of Science SATARA Satara

प्राचार्य
यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयुट ऑफ सायन्स
सातारा.

अनुदानित / विनाअनुदानित व स्वंयअर्थसहाय्यीत विभागाकडे **शै.वर्ष १९९० ते दि.२१/०६/२०१७** अखेर हंगामी स्वरुपात काम केलेल्या शिक्षक संवर्गाच्या माहितीबाबत.

# रयत शिक्षण संस्था, सातारा

**कर्मवीर समाधी परिसर, सातारा**
**प्राथमिक/माध्यमिक, अध्यापक विद्यालये, उच्च माध्यमिक /**
**कनिष्ठ महाविद्यालये व व्यवसाय अभ्यासक्रम विभाग**
**परिपत्रक क्र. १२ दि.०२/०९/२०२१**

**प्रति,**
**सर्व शाखाप्रमुख,**
**प्राथमिक / माध्यमिक, अध्यापक विद्यालये, उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये व व्यवसाय अभ्यासक्रम विभाग,**
**रयत शिक्षण संस्था.**

रयत शिक्षण संस्थेने परिपत्रक क्र.५७ दि.२१/१२/२०१८ नुसार अनुदानित / विनाअनुदानित / स्वंयअर्थसहाय्यीत प्राथमिक / माध्यमिक, अध्यापक विद्यालये, उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये व व्यवसाय अभ्यासक्रम या विभागाकडे शैक्षणिक वर्ष १९९० पासून दि.२९/१२/२०१८ अखेर हंगामी स्वरुपात सी.एच.बी., लमसम, रजामुदत, अर्धवेळ व पूर्णवेळ पदावर काम केलेल्या शिक्षकांची माहिती संकलित करण्यास कळविले होते. त्यानुसार शाखेने संबंधित सेवकांची वैयक्तिक माहिती दिलेल्या नमुना प्रपत्रामध्ये सेवा तपशिलासह भरून (नियुक्ती आदेश, हजर व कार्यामुक्ती आदेश इ. कागदपत्राच्या आधारे) सदरची माहिती तपासून संस्थेच्या वेबसाईटवर भरण्यास कळविले होते. त्यानुसार संबंधित सेवकांच्या माहितीच्या प्रत्येकी दोन फाईल तयार करून, त्या पैकी एक फाईल शाखा दप्तरी ठेऊन दुसरी फाईल आपल्या विभागीय कार्यालयात जमा करण्यास कळविले होते.

आता अशा सेवकांची संकलित झालेली माहिती एकत्रित करून संस्थेच्या www.rayatshikshan.edu या वेबसाईटवर **'हंगामी सेवक माहिती'** प्रसिद्ध केली आहे.( **'हंगामी सेवक माहिती'** या लिंकवर क्लिक करावे) सदरची माहिती आपल्या शाखेतील संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणून त्यामध्ये काही दुरुस्त्या व हरकती असल्यास त्याची माहिती योग्य त्या कागदपत्रासह आपल्या विभागीय कार्यालयाकडे दि.१४/०९/२०२१ अखेर पाठवावी.

तसेच या यादीमध्ये समावेश नसलेल्या व **शैक्षणिक वर्ष १९९० ते दि.२१/०६/२०१७** या कालावधीत हंगामी स्वरूपात काम केलेल्या संबंधित सेवकांची माहिती (**मूळ नेमणूक दिनांकापासून ते दि.२१/०६/२०१७** अखेरची त्याची वैयक्तिक माहिती व त्याने नियुक्ती आदेशानुसार हंगामी स्वरुपात केलेल्या कामाचा तपशील इत्यादी) सोबत दिलेल्या प्रपत्रामध्ये दोन प्रतीत भरून घेऊन, त्यावर त्याची स्वाक्षरी घ्यावी. संबंधित सेवकाने प्रपत्रामध्ये भरलेली माहिती तुम्ही तपासून ती बरोबर असल्याची खात्री करून त्या प्रपत्रावर स्वाक्षरी करावी व त्याची एक फाईल शाखा दप्तरी ठेऊन दुसरी फाईल आपल्या विभागीय कार्यालयात जमा करावी.

सादर

**सचिव,**
**रयत शिक्षण संस्था, सातारा.**

माहितीसाठी,
सहसचिव (उ.शि.), रयत शिक्षण संस्था, सातारा
सहसचिव (माध्य.), रयत शिक्षण संस्था, सातारा
ऑडीटर, रयत शिक्षण संस्था, सातारा.
विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, मध्य / दक्षिण/ उत्तर/ पश्चिम व रायगड विभाग.

Y. C. Institute of Science
Satara
Inward No.- 3597
Date - 3/9/2021.

श्री. कंवडे एल.टी.
श्री डोंबाळे गणेश
3/9/2021

pan २९ -६९-
3/9/2021

# रयत शिक्षण संस्था, सातारा

## प्रायमिक/माध्यमिक, अध्यापक विद्यालये, उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये व व्यवसाय अभ्यासक्रम विभाग

### प्रपत्र

१) सेवकाचे नाव
२) पत्ता
३) जात
४) जात                    जातीचा प्रवर्ग
५) जन्म दिनांक
६) शैक्षणिक अर्हता                    (पदव्युत्तर पदवीचा गुणांकन वर्ग)
७) विषय                    (पदव्युत्तर पदवीचा)
८) समांतर आरक्षण                    (प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक व अपंग)
९) सेवकाने केलेल्या हंगामी सेवेचा तपशील

| अ. क्र. | शाखेचे नाव | प्रकार अनुदानित / विनाअनुदानित / स्वयंअर्थसहाय्यीत ) | नियुक्ती प्रकार (पुर्णवेळ,अर्धवेळ,तासिका तत्वावर,रजामुदत,समसम) | दिनांक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |

एकूण सेवाकाल - ०० वर्ष, ०० महिने, ०० दिवस.

**वरील तक्त्यात भरलेली माहिती बिनचूक व बरोबर असून त्यात कोणत्याही स्वरुपाची खोटी माहिती दिलेली नाही याची मी हमी देत आहे.**

**दिनांक**                    **सेवकाची सही**

**वरील माहिती रेकॉर्ड नुसार तपासून बिनचूक असल्याची खात्री केलेली आहे. यामध्ये तफावत आढळल्यास त्याची सर्वस्वी वैयक्तिक जबाबदारी माझी राहील.**

**दिनांक**                    **शाखाप्रमुख सही व शिक्का**

**वरील माहिती बिनचूक असल्याची खात्री केलेली आहे. यामध्ये तफावत आढळल्यास त्याची सर्वस्वी वैयक्तिक जबाबदारी माझी राहील.**

**दिनांक**                    **विभागीय अधिकारी सही व शिक्का**